# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. १७ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## बँकिंग क्षेत्रातील गैरव्यवहारांना चाप

भारतीय वित्तीय व्यवस्थेमध्ये बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सर्वसामान्य नागरिक आपल्या कष्टाची कमाई अत्यंत विश्वासाने बँकांमध्ये जमा करत असतात. अशा परिस्थितीत या ठेवीदारांच्या पैशांचे रक्षण करणे आणि बँकिंग व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवणे हे देशाच्या केंद्रीय बँकेचे मुख्य कर्तव्य असते.

---> अग्रलेख - पान 2 वर

## ठाकरेंच्या सहा खासदारांपाठोपाठ एकनाथ शिंदेही दिल्लीच्या दिशेने

**मुंबई :** राज्यात ऑपरेशन टायगरला सुरुवात झाली असून ठाकरेंच्या शिवसेनेमध्ये पुन्हा एकदा फूट पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ठाकरेंचे नऊ पैकी सहा खासदार हे दिल्लीत दाखल झाले असून एकनाथ शिंदेंही रात्री दिल्लीला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दिल्लीत दाखल झालेले ठाकरेंचे खासदार हे बुधवारी सकाळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेणार असल्याची माहिती आहे. त्याच चर्चेसाठी शिंदेंच्या शिवसेनेचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे ओम बिर्ला यांच्या निवासस्थानी पोहोचल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## थोडक्यात वार्ता

### तुकाराम मुंढेंचं रक्त काढून इतर विभागप्रमुखांना द्या, म्हणजे...; माजी मंत्री सुबोध सावजी

**बुलढाणा :** राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभाग (FDI) अचानक ॲक्शन मोडवर आला असून गेल्या महिनाभरात कारवाईचा धडाकाच लागला आहे. मुंढेंच्या या कारवाईचं राज्यभरातून स्वागत होत असून शेतकऱ्यांकडूनही त्यांच्या कामाला कौतुक करत चक्क त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करण्यात आल्याचं पाहायला मिळालं. बुलढाणा जिल्ह्यातील नेते आणि माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून वेगळीच मागणी केलीय. "महाराष्ट्रात कायदेशीर आदेशाची अंमलबजावणी तुकाराम मुंढे करत आहेत आणि त्यांच्या कारवाईमुळेच भ्रष्टाचार व भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत. राज्यात सध्या भेसळखोर आणि भ्रष्टाचाराला आळा बसत आहे. तुकाराम मुंढे ज्याप्रमाणे काम करत आहेत तसंच काम आपणांसह सर्व खातेप्रमुखांनी करावं अशी जनतेची भावना आहे. मात्र, तसं होताना दिसत नाही. त्यामुळे, तुकाराम मुंढे यांचं एक बाटली रक्त काढून ते थोडं थोडं आपणांसह राज्यातील सर्व खाते प्रमुखांना द्यावं, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडे केली आहे.

### अतिरिक्त आयुक्त पदी प्राजक्ता लवंगारे-वर्मा यांची नियुक्ती

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांची बदली करून त्यांची नियुक्ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) अतिरिक्त महानगर आयुक्तपदी करण्यात आली आहे. त्यांच्या जागी वरिष्ठ आयएएस अधिकारी प्राजक्ता लवंगारे-वर्मा यांची अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.१५ सप्टेंबर २०२३ रोजी अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्त झालेल्या डॉ. जोशी यांचा कार्यकाळ पूर्ण होण्यास काही महिने बाकी असतानाच त्यांची बदली करण्यात आल्याने प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. महापालिका आयुक्तपदी आश्विनी भिडे यांची नियुक्ती झाल्यानंतर जोशी यांच्या बदलीची शक्यता व्यक्त केली जात होती. महापालिकेतील कार्यकाळात डॉ. जोशी यांनी मालमत्ता कर वसुलीत विक्रमी कामगिरी केली. तसेच अतिक्रमण आणि फेरीवाल्यांविरोधातील कारवाईला गती देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. आरोग्य विभागातील त्यांच्या पूर्वीच्या कामगिरीलाही विशेष दाद मिळाली होती.दरम्यान, पावसाळ्याच्या तोंडावर शहराच्या आपत्कालीन व्यवस्थापनाशी संबंधित महत्त्वाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकाऱ्याची बदली करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मुंबईच्या भौगोलिक परिस्थितीची सखोल माहिती असलेल्या डॉ. जोशी यांच्या बदलीमुळे प्रशासनाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### पाऊस 23 जूननंतरच, पाणी जपून वापरा!

**मुंबई :** राज्यात मान्सूनचे आगमन लांबणीवर गेल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये उद्भवलेल्या पाणीटंचाईचे पडसाद मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उमटले. राज्यातील धरणांमध्ये सध्या केवळ २५ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिल्याने चिंता व्यक्त करण्यात आली. उपलब्ध पाणीसाठ्याचे संकट लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले असून, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाणी अत्यंत जपून वापरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, हवामान अंदाजानुसार येत्या २३ जूननंतर राज्यात मान्सून पूर्ववत सक्रिय होईल, अशी शक्यता बैठकीत वर्तवण्यात आली. मंगळवारी मंत्रालयात आयोजित मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा विभागातर्फे राज्यातील धरणांमधील पाणीसाठ्याबाबतचे सविस्तर सादरीकरण (प्रेझेंटेशन) करण्यात आले. या अहवालातील आकडेवारी अत्यंत चिंताजनक असून, पुढील अडीच महिने पाण्याचा काटेकोर वापर करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर असणार आहे.

### "खरं की काय"




# संपूर्ण कर्जमुक्तीच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरला बळीराजा; शिवसेनेची ट्रॅक्टर रॅली चर्चेत

हिंदू प्रकाशवार्ता

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना कोणत्याही अटी-शर्तीशिवाय संपूर्ण कर्जमुक्ती मिळावी, सातबारा कोरा करण्यात यावा आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे सरकारने तातडीने लक्ष द्यावे या मागण्यांसाठी शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या संयोजकतेखाली मराठवाडाव्यापी 'बळीराजा गर्जना' ट्रॅक्टर रॅली मंगळवार,16 जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली.







क्रांती चौक येथून विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत निघालेल्या या रॅलीला रोखण्यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता. गोपाल टी कॉर्नर परिसरात बॅरिकेड्स उभारून शेतकरी आणि शिवसैनिकांनी आणलेले ट्रॅक्टर अडविण्यात आले. आंदोलनासाठी मोठ्या प्रमाणावर पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आल्याने आंदोलनस्थळी पोलीसच मोठ्या प्रमाणावर दिसत होते.

"छत्रपती शिवाजी महाराज की जय", "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जिंदाबाद", "शिवसेना जिंदाबाद", "नको अटी - नको शर्ती, आम्हाला पाहिजे - कर्जमुक्ती" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. ट्रॅक्टरना भगवे झेंडे आणि कर्जमुक्तीच्या मागण्यांचे फलक लावण्यात आले होते.

या रॅलीचे नेतृत्व स्वतः आमदार अंबादास दानवे यांनी ट्रॅक्टर चालवत केले. त्यांच्या ट्रॅक्टरवर शिवसेना नेते चंद्रकांत खैरे आणि शिवसेना उपनेते सुभाष पाटील उपस्थित होते. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेले शेतकरी, शिवसैनिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

रॅलीनंतर विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये राज्य सरकारने जाहीर केलेली

-> पान 2 वर

# बनावट खताचा गोरखधंदा; 15.29 लाखांचा साठा जप्त

## पुणे–अहिल्यानगर–यवतमाळ कनेक्शन उघड; चार आरोपींसह अन्य अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शेतकऱ्यांना अनुदानित खताच्या नावाखाली बनावट मिश्र खत विक्री करून शासन आणि शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश विभागीय व जिल्हा भरारी पथकाने केला आहे. धुळे–सोलापूर बायपासवरील गांधीली शिवार येथे कारवाई करत तब्बल 15 लाख 29 हजार 800 रुपयांचा संशयित बनावट खतसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी चिकलठाणा पोलीस ठाण्यात चार जणांसह अन्य अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



खत निरीक्षक तथा तंत्र अधिकारी आणि विभागीय भरारी पथकाचे अध्यक्ष आशिष काळुशे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार 15 जून रोजी सकाळी धुळे–सोलापूर बायपास रोडवर एमएच-28-बीबी-9899 क्रमांकाच्या ट्रकमधून संशयास्पद खताची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर मोहीम अधिकारी पी. ए. ताजणे व सदस्य श्रीकृष्ण बंडगर यांच्यासह भरारी पथकाने गांधीली शिवार येथे ट्रक अडवून तपासणी केली.

तपासणीदरम्यान ट्रकमध्ये 'श्री गोदावरी किसान कृषि जनकल्याण उर्वरक' या नावाने एनपीके 10-20-20, 20-20-00 आणि 18-18-10 प्रकारच्या खतांच्या एकूण एक हजार बॅगा आढळून आल्या. त्यामध्ये 460 बॅग एनपीके 10-20-20, 320 बॅग एनपीके 20-20-00 आणि 220 बॅग एनपीके 18-18-10 खताचा समावेश होता.

# गोगाबाबा टेकडी परिसरात 27 वर्षीय सहशिक्षिकेची गळफास घेऊन आत्महत्या; कारण अद्याप अस्पष्ट



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील गोगाबाबा टेकडी परिसरात २७ वर्षीय तरुणीने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रेणुका शांताराम गांगुर्डे (वय २७) असे मृत तरुणीचे नाव असून त्या एस.बी. महाविद्यालयात सहशिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. तसेच त्या पोलीस भरतीची तयारी करत असल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोगाबाबा टेकडी परिसरात एका तरुणीने गळफास घेतल्याची माहिती बेगमपुरा पोलिसांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला.

रेणुका गांगुर्डे यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. घटनास्थळावरून कोणतीही संशयास्पद बाब आढळली आहे का, याबाबत पोलीस तपास करत आहेत.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून बेगमपुरा पोलीस ठाण्याकडून पुढील तपास सुरू आहे.

# मंगळसूत्र चोरांकडून 9.32 लाखांचा मुद्देमाल जप्त

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील महिलांना लक्ष्य करत मंगळसूत्र चोरीच्या घटनांनी दहशत निर्माण करणाऱ्या सराईत चोरट्यांच्या टोळीचा शहर गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून ९ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मंगेश शहाणे, अमोल गलाटे, अल्ताफ शेख आणि शेख सिराजुल हक यांचा समावेश आहे. हे आरोपी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडणाऱ्या महिलांना हेरून चाकूचा धाक दाखवत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पळ काढत असल्याचे तपासात समोर आले आहे.

गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपींना ताब्यात घेऊन केलेल्या चौकशीत त्यांनी शहरातील विविध भागांतील ११ गुन्ह्यांची कबुली दिली. यामध्ये पुंडलिकनगर, जवाहरनगर, चिकलठाणा, सिडको, एमआयडीसी वाळूज आणि सातारा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील मंगळसूत्र चोरीच्या घटनांचा समावेश आहे.

तपासादरम्यान चोरी केलेले सोन्याचे दागिने सोनारामार्फत विक्री केल्याचेही निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपींकडून सुमारे १० तोळे सोन्याचे दागिने तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या चार मोटारसायकली जप्त केल्या आहेत.

महिलांच्या सुरक्षेला आव्हान ठरणाऱ्या या टोळीचा अखेर पर्दाफाश करण्यात शहर गुन्हे शाखेला यश आले असून, पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# शिक्षकाच्या मृत्यूप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक अटकेत; दोषी आढळलेल्या दोन पोलिसांवर निलंबनाची कारवाई

## पोलीस अधीक्षकांची कठोर भूमिका, सखोल तपास सुरु

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील शिक्षक सुरेश रुपचंद बोरसे (वय ५१) यांच्या मृत्यूप्रकरणी मोठी घडामोड समोर आली असून, या प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक एकनाथ विश्वनाथ नागरगोजे यांना आरोपी करण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने त्यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

सुरेश बोरसे यांचे ११ जून रोजी निधन झाले होते. त्यांच्या मृत्यूस काही व्यक्ती कारणीभूत असल्याचा आरोप करत पत्नी अनिता सुरेश बोरसे (वय ४७, रा. कौशिक गल्ली, वेरूळ) यांनी खुलताबाद पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०६(१) व १३१ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

या घटनेची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी प्राथमिक चौकशीचे आदेश दिले होते. चौकशीत पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नागरगोजे आणि पोलीस अंमलदार वाल्मिक बनगे यांच्याकडून कर्तव्यात त्रुटी झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर दोघांनाही तात्काळ प्रभावाने सेवेतून निलंबित करण्यात आले.

दरम्यान, मृताच्या कुटुंबीयांच्या जबाबांच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक नागरगोजे यांना या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले असून त्यांना एलसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. सध्या ते खुलताबाद पोलीस ठाण्यात एलसीबीच्या ताब्यात आहेत.

या प्रकरणाचा सर्वंकष आणि निष्पक्ष तपास सुरू असून, दोषी कोणताही असला तरी त्याला पाठीशी घातले जाणार नाही, अशी स्पष्ट आणि कठोर भूमिका पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी घेतली आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील पोलीस दलात खळबळ उडाली असून या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जखमी तरुणाला जीवदान ; PI राजेश यादव यांच्या तत्परतेने वाचले प्राण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** रस्ते अपघातानंतर अनेकदा मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागते. मात्र पैठण रोडवरील माँ बाप की दर्गा पुलाजवळ झालेल्या अपघातात पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे एका तरुणाला वेळेत उपचार मिळाले. पोलीस निरीक्षक राजेश यादव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जखमी तरुणाला तातडीने रुग्णालयात दाखल केल्याने त्याचे प्राण वाचल्याची चर्चा परिसरात होत आहे. सोमवारी (१५ जून) दुपारी सुमारे १.१५ वाजण्याच्या सुमारास पैठण रोडवरील माँ बाप की दर्गा पुलाजवळ ही घटना घडली. वाळूज वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेश यादव यांना घेऊन चालक पोलीस अंमलदार नारायण तुपे हे शासकीय कामानिमित्त सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा कार्यालयाकडे जात होते. यावेळी भरधाव वेगाने येणाऱ्या एका दुचाकीस्वाराने पोलीस वाहनाच्या डाव्या बाजूस मागून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत पोलिसांनी कोणतीही वेळ न दवडता जखमीला तात्काळ आपल्या वाहनातून पैठण रोडवरील गोल्डन सिटी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यामुळे त्याच्यावर त्वरित उपचार सुरू होऊ शकले. जखमी तरुणाने आपले नाव सुनील बाबुलाल जांगिड (वय २७) असे सांगितले. तो मूळचा राजस्थानमधील असून सध्या छत्रपती संभाजीनगर येथे कामानिमित्त वास्तव्यास आहे. पोलिसांनी त्याच्या नातेवाईकाशी संपर्क साधून त्याला घटनेची माहिती दिली. सध्या सुनीलवर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून स्वतः जखमी होण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी तसेच पोलीस वाहनाचे नुकसान केल्याप्रकरणी संबंधित दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अंमलदार संतोष जाधव करीत आहेत.

अपघातग्रस्ताला वेळेत मदत मिळणे किती महत्त्वाचे असते, याचे उदाहरण या घटनेतून पुन्हा एकदा समोर आले. कर्तव्य बजावत असतानाच पोलिसांनी दाखविलेल्या मानवतेच्या या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आरोग्यमंत्र्यांच्या मतदारसंघातच चटई अंथरुन रुग्णांवर उपचार

## सलाईन नाही अब्रू टांगली, रोहित पवारांकडून फोटो शेअर

**परभणी :** जिंतूर तालुक्यातील पिंपराळा गावात नागरिकांना अतिसार सदृश्य आजार झाल्यानंतर त्यांचेवर गावातील मंदिरासमोरच चटई अंथरुण उपाचर केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ॲम्ब्युलन्स आणि सर्व टीम सोबत घेऊन गेलेले डॉक्टर रुग्णाच्या मर्जीखातर गावातच इलाज करत असल्याचे त्यांच्या वतीने सांगण्यात आले. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी सोशल माध्यमात पोस्ट करत या मतदारसंघाच्या मंत्री मेघना बोर्डीकर यांच्यावर निशाणा साधला आहे. तर, हे जिल्हा परिषद सर्कल राष्ट्रवादीच्याच जिल्हा परिषद सदस्याचे असल्याचे सांगत भाजपकडूनही (BJP) राजकीय भूमिका मांडण्यात आलीय. त्यामुळे, दोन्ही बाजूने सोशल मीडियावर आरोप प्रत्यारोप सुरू झाले आहेत.

जिंतूरमधील पिपराळा गावात 13 जून म्हणजेच शुक्रवारपासून महिला-पुरुषांना संडास, पोटदुखीचा त्रास सुरू आहे. त्यावर गावातील आशा वर्कर अंजना डाखोरे यांनी प्राथमिक उपचार म्हणून औषध गोळ्या दिल्या, त्याने फरक पडत नसल्याने चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी डॉ. विवेकानंद खांडरे, आरोग्य सेवक आणि परिचारिका यांच्याकडून गावातील हनुमान मंदिरासमोर 20/25 महिलांना सलाईन लावून उपचार सुरू करण्यात आले.

# हेडगेवार रुग्णालयाबाहेरील बसथांबा 'गिळंकृत'; दुचाकी अतिक्रमणामुळे प्रवाशांच्या कोंडीत भर

## सर्वसामान्यांवर दंडाचा 'हातोडा', पण बसथांबा मात्र अतिक्रमणाच्या विळख्यात; महापालिका व वाहतूक पोलिसांच्या भूमिकेवर सवाल

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी विविध ठिकाणी कारवाईचा धडाका सुरू असताना हेडगेवार रुग्णालयासमोरील बसथांबा मात्र पूर्णपणे अतिक्रमणाच्या विळख्यात अडकला असल्याचे चित्र दिसत आहे. प्रवाशांसाठी राखीव असलेली सार्वजनिक बसथांब्याची जागा सध्या दुचाकी वाहनांच्या बिनधास्त पार्किंगमुळे व्यापली गेली असून, बसथांबा हरवल्याचे वास्तव समोर येत आहे.






बसथांब्याच्या संपूर्ण परिसरात मोठ्या प्रमाणावर दुचाकी उभ्या केल्या जात असल्याने प्रवाशांना बसची प्रतीक्षा थेट रस्त्यावर उभे राहून करावी लागत आहे. त्यामुळे वेगाने धावणाऱ्या वाहनांच्या मध्ये उभे राहून प्रवासाची वाट पाहावी लागत असल्याने सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गर्दीच्या वेळेत येथे होणारी वाहतूक कोंडी आणि गोंधळ हे नेहमीचाच झाला आहे.

दुसरीकडे, शहरातील विविध भागांत 'नो पार्किंग'मध्ये वाहन आढळल्यास तत्काळ दंडात्मक कारवाई केली जाते. अनेक वाहनचालकांकडून हजारो रुपयांचा दंड वसूल केला जातो. मात्र डॉक्टर हेडगेवार रुग्णालय समोर सार्वजनिक बसथांबा खुलेआम पार्किंग झोनमध्ये रूपांतरित होत असताना याकडे डोळेझाक का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

रुग्णालय परिसर असल्याने येथे रुग्णवाहिका आणि आपत्कालीन वाहनांची सतत वर्दळ असते. तरीही बसथांब्याजवळील अतिक्रमणामुळे रस्त्याची उपलब्ध रुंदी कमी झाली असून वाहतुकीचा वेग मंदावला आहे. काही वेळा या भागात कोंडी निर्माण होऊन संपूर्ण परिसरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत होत असल्याचे चित्र आहे.

"बसथांबा प्रवाशांसाठी आहे की वाहनांच्या पार्किंगसाठी?" असा प्रश्न आता परिसरात ठळकपणे चर्चेत येत आहे. सार्वजनिक जागेचा असा वापर कोणाच्या परवानगीने सुरू आहे, याचे उत्तर मात्र अद्याप मिळत नाही. नियम सर्वांसाठी समान असतील तर या ठिकाणी अपवाद का, असा नागरिकांचा संतप्त सवाल करत आहे.

महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी या प्रकाराकडे तातडीने लक्ष देऊन बसथांबा परिसर अतिक्रमणमुक्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सं पा द की य

## बँकिंग क्षेत्रातील गैरव्यवहारांना चाप

भारतीय वित्तीय व्यवस्थेमध्ये बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सर्वसामान्य नागरिक आपल्या कष्टाची कमाई अत्यंत विश्वासाने बँकांमध्ये जमा करत असतात. अशा परिस्थितीत या ठेवीदारांच्या पैशांचे रक्षण करणे आणि बँकिंग व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवणे हे देशाच्या केंद्रीय बँकेचे मुख्य कर्तव्य असते. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वित्तीय संस्थांवर भारतीय रिझर्व्ह बँकेकडून सातत्याने केली जाणारी कारवाई ही याच उत्तरदायित्वाचा एक भाग आहे. नुकतीच मुंबईतील एका सहकारी बँकेवर घालण्यात आलेली बंदी ही बँकिंग क्षेत्रातील वाढत्या शिथिलतेला दिलेला एक स्पष्ट इशारा मानली पाहिजे. आपल्या अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व लहान-मोठ्या बँकांवर रिझर्व्ह बँकेचे अतिशय बारकाईने लक्ष असते. ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ही केंद्रीय संस्था खाजगी, सार्वजनिक तसेच सहकारी क्षेत्रातील बँकांच्या कामकाजाचे नियमित मूल्यमापन करत असते. जेव्हा एखादी बँक आर्थिक नियमांचे सरळसरळ उल्लंघन करते किंवा तिच्या व्यवस्थापनात त्रुटी आढळतात, तेव्हा कठोर पावले उचलणे अनिवार्य ठरते. केवळ चेतावणी देऊन सुधारणा होत नसेल, तर थेट व्यावसायिक निर्बंध लादणे हाच एकमेव पर्याय उरतो. मुंबईतील वित्तीय संस्थेच्या बाबतीत नेमके हेच घडल्याचे दिसून येते. संबंधित सहकारी बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत खालावल्याचे समोर आल्यानंतर रिझर्व्ह बँकेने हे कडक पाऊल उचलले आहे. हे निर्बंध पुढील सहा महिन्यांसाठी लागू करण्यात आले असून, परिस्थितीनुसार त्याचा पुनर्विचार केला जाणार आहे. या काळात संबंधित बँकेला कोणतेही नवीन कर्ज मंजूर करण्याचा किंवा जुन्या कर्जांचे नूतनीकरण करण्याचा अधिकार असणार नाही. तसेच कोणत्याही प्रकारची नवीन गुंतवणूक करणे, नवीन ठेवी स्वीकारणे किंवा इतर वित्तीय दायित्वे अंगावर घेणे यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. आर्थिक शिस्त बिघडलेल्या बँकेला अधिक नुकसान करण्यापासून रोखण्यासाठी असे निर्बंध आवश्यक असतात. बँकेवर बंदी आल्यानंतर सर्वात मोठा फटका आणि चिंता सर्वसामान्य ठेवीदारांना बसते. ही बाब विचारात घेऊन रिझर्व्ह बँकेने ठेवीदारांना ठराविक मर्यादेपर्यंत रक्कम काढण्याची परवानगी दिली आहे. बँकेच्या सध्याच्या रोख स्थितीचा अंदाज घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे, जेणेकरून ग्राहकांमध्ये घबराट पसरणार नाही. बँकिंग व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी अशा प्रकारची सुरक्षा यंत्रणा महत्त्वाची ठरते. सदर बँकेच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी केंद्रीय बँकेकडून संचालक मंडळ आणि वरिष्ठ व्यवस्थापनाशी सातत्याने संपर्क साधला जात होता. परंतु, व्यवस्थापनाकडून नियामकांच्या चिंता दूर करण्यासाठी किंवा ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कोणतीही ठोस आणि प्रभावी पावले उचलली गेली नाहीत. व्यवस्थापनाच्या याच उदासीनतेमुळे अखेर ही कठोर कारवाई करावी लागली. सहकारी बँकिंग क्षेत्रात अशी उदाहरणे वारंवार समोर येणे चिंताजनक असून, ग्राहकांनीही आपल्या बँका निवडताना त्यांच्या आर्थिक आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

## तक्रारींची दखल : त्रास देऊन पैसे मागणाऱ्यांविरोधात कडक पावले

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** शहरातील वाहतूक सिग्नल, चौक, रस्ते तसेच लग्नसमारंभ, धार्मिक कार्यक्रम, सण-उत्सव आणि जन्म-मृत्यू यांसारख्या प्रसंगी नागरिकांना त्रास देत पैशांची मागणी करणाऱ्यांविरोधात पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. वाढत्या तक्रारींची दखल घेत पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत विशेष प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

शहरात काही गटांकडून, विशेषतः तृतीयपंथीयांकडून, विविध समारंभ आणि सार्वजनिक ठिकाणी जाऊन पैशांची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. अनेक ठिकाणी वाहनचालक, प्रवासी आणि नागरिकांना अडवून पैसे देण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचे प्रकार समोर आले आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच नागरिकांना होणारा त्रास रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

या आदेशानुसार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १४ जून ते १२ ऑगस्ट या कालावधीत अशा प्रकारे जबरदस्तीने किंवा त्रास देत पैशांची मागणी करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी अशा घटना आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## संपूर्ण कर्जमुक्तीच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरला बळीराजा; शिवसेनेची ट्रॅक्टर रॅली चर्चेत

पान 1 वरून ->

कर्जमाफी योजना ही प्रत्यक्षात कर्जमाफी नसून कर्जवसुलीची योजना असल्याचे उल्लेखीत केले. शेतकऱ्यांची कोणत्याही अटी-शर्तीशिवाय संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

तसेच कांदा, कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव द्यावा, पीककर्ज व कर्ज नूतनीकरणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, खतांचा काळाबाजार रोखावा, शेतीपंपांना सलग वीजपुरवठा करावा, अतिवृष्टीग्रस्तांसाठी घोषित 33 हजार कोटी रुपयांच्या मदत पॅकेजची तातडीने अंमलबजावणी करावी आणि विमा कंपन्यांकडून योग्य नुकसानभरपाई मिळावी, अशा विविध मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

या सर्व मागण्या तातडीने मान्य न झाल्यास शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आणखी तीव्र आणि व्यापक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

याप्रसंगी माजी आमदार उदयसिंग राजपूत, सहसंपर्कप्रमुख राजेंद्र काळे, जिल्हा संघटक डॉ. सुनील शिंदे, उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर, किशोर कच्छवाह, संतोष खेंडके, किसानसेना जिल्हाप्रमुख नानासाहेब पळसकर, बाबासाहेब मोहिते, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, ज्ञानेश्वर डांगे, दिग्विजय शेरखाने, तालुकाप्रमुख विष्णू जाधव, शंकर ठोंबरे, आनंद भालेकर, सोमीनाथ करपे, दिलीप मचे, संजय मोटे, विधानसभा प्रमुख प्रमोद ठेंगडे, विधानसभा संघटक गिरीश चपळगावकर, गणेश नवले, कपिद्र पेरे, उपशहरप्रमुख सोमीनाथ नवपुते, नितीन पवार, गोरख सोनवणे, अजय चोपडे, बापू कवळे, दिनेशराजे भोसले, सुरेश गायके, वसंतभाई शर्मा,नगरसेवक सचिन खैरे, रामेश्वर कोरडे, राहुलकुमार सोनवणे,नंदू लबडे, गजेंद्र दळवी,नरेंद्र देवत्वाल, देविदास रत्नपारखी, बाबासाहेब बडक,नारायण जाधव, प्रतीक अंकुश, ज्ञानेश्वर शेळके, रामू सुरासे, रामेश्वर काळे, दीपक महाडिक,विजय यादव,सुरेश थोरमोठे,राजेंद्र पवार, सलीम खामगावकर, देवेंद्र गायकवाड, किरण जोशी, स्वप्निल ढाकणे,दीपक तांबे,मयुर तुपे,युवासेना विभागीय सचिव धर्मराज दानवे,अभिजीत थोरात, रामू सुरासे,नागेश थोरात, महिला आघाडी महानगर संघटक सुकन्या भोसले, दुर्गा भाटी व सीमा गवळी उपस्थित होते.

# सुपर अल-निनो म्हणजे समस्याही सुपर !

आपल्या देशात 1972 साली सर्वात मोठा दुष्काळ पडला होता. त्याकाळी हवामानाचा वेध घेण्यासाठी उपग्रह यंत्रणा तसेच वातावरणात होणारे बदल याची माहिती जवळपास नव्हती. दुष्काळ आला इतकच ज्ञान सर्वांना होतं . आता बदलत्या तंत्रामुळे एल निनो अन् सूपर अल निनो याची माहिती खूप आधी आपणास झाली आहे. 1972 सालचा दुष्काळ सर्वांना यासाठी स्मरणात आहे की, त्याकाळी मोठ्या प्रमाणावर अन्नटंचाई निर्माण झाली होती.

शेतीचे उत्पादन नगण्य झाल्याने खाण्यासाठी धान्य नाही अशी स्थिती असल्याने अमेरिकेतून आपणास धान्य मागवावे लागले होते. नंतरच्या काळात तांत्रिक आणि यांत्रिक प्रगती झपाट्याने झाली असली तरी समस्या कमी झालेली नाही. उलट समस्येचे स्वरूप खूप बदलले आहे आणि गंभीर झाले आहे. याची आपणास जाणीव असणे गरजेचे आहे.

1971 साली भूजल उपशाचे प्रमाण नगण्य होते आणि लोकसंख्या देखील मर्यादित होती. मात्र गेल्या 5 दशकात शहरीकरण झपाट्याने झाले आणि लोकसंख्या देखील झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे यावेळी पिकांचे संकट अधिक पेयजलाचे संकट असे दुहेरी संकट आपणासमोर आहे.

यांत्रिकीकरणात झालेली वाढ आणि ऊस, कापूस या सारख्या नगदी व नफा देणाऱ्या पिकांकडे शेतकरी वर्ग वळला, यामुळे भूजल ऊपसा प्रचंड प्रमाणात सुरू आहे. धरणे जरी बांधली गेली असली तरी त्या धरणाच्या पाण्याचा वापर उद्योग , कृषी आणि पेयजल असा विभागला आहे. नागरिकांच्या पेयजलाची काळजी घेण्यासाठी ठराविक क्षमतेनंतर कृषीला अर्थात सिंचनाला पाणी दिले जात नाही. सध्या दोन नक्षत्रे कोरडी गेली असल्यानं हे संकट अधिक गहिरं झालं आहे.

शेतकऱ्यांना निसर्ग जणू नाराज आहे आणि दुसऱ्या बाजूला आता सिंचनासाठी पाणी न देण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग अक्षरशः आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.




अल-निनो समजून घेताना त्याच्या तांत्रिक बाबीत सांगता येईल की, प्रशांत महासागरात पाण्याचे तापमान सुमारे 2 अंश सेल्सिअस वाढल्याने संपूर्ण निसर्गचक्र बदलले आहे.

**नेमेची येतो पावसाळा-:**

असं आपण म्हणतो पण यंदा त्याचा नेम चुकलाय आणि तो कधी आणि किती येईल हे सांगणे अवघड झालय. आलाच पाऊस तर नेमकेपणाने तो कुठे, कधी आणि किती पडेल हा देखील सवाल आहे. अशा पार्श्वभूमीवर शेतकरी वर्गाला सातत्याने हवामान खात्याचा इशारा बघा, माहिती घ्या आणि पेरणी करण्याबाबत घाई करू नका असा झाला आहे.

अल निनोची स्थिती निसर्गतः दर काही काळाने येते मात्र त्याचं गांभीर्य वाढत आहे याचं एकमेव कारण म्हणजे आपण चालवलेला नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर होय.

मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड ही जगासमोरील एक मोठी समस्या आहे. सोबतच जंगलांना लागणारी आग अर्थात वन-वणव्यात नष्ट होणारी जंगले यामुळे पृथ्वीवरील वृक्षाच्छादन झपाट्याने घटताना दिसत आहे.

2015 च्या फ्रान्स करारानुसार कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा निर्णय झाला परंतु यातून अमेरिकेने माघार घेतली. त्यासोबतच जगभरात जिवाश्म इंधन अपरिमितरित्या वापरले जात आहे. यातून होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाचा परिणाम वैश्विक पातळीवर होत आहे.

मोठमोठ्या हिमनद्या तसेच अर्क्टीक व अंटार्टिका मधील बर्फ वेगाने वितळून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत आहे. याचा धोका थेट पूर्ण पर्यावरणास आहे. आपण आपल्या महत्वाकांक्षा आणि पैशाच्या बळावर नैसर्गिक संसाधनं ओरबाडत आहोत, असेच म्हणावे लागेल.

पाऊस कमी, दुष्काळ, पाऊस जास्त, अतिवृष्टी, आणिबाणीची स्थिती हे एक चक्र आहे. शासन यात दिलासा नक्की देत आहे पण निसर्ग हा निसर्ग आहे.

_Nature is biggest leveler _... अशी उक्ती आहे. निसर्ग कोपला तर काय यावर डिस्कव्हरी वाहिनीने Raging Planet नावाची मालिका बनवली आहे ती आपण बघितली पाहिजे.

आपण निसर्गाचाच एक घटक आहोत, आधी बुद्धीमत्ता आणि आता आलेली कृत्रिम बुद्धीमत्ता यांच्या बळावर आपण निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. परंतु हे सर्व प्रयत्न एका फटक्यात आपणास काय स्थितीत नेवून पोहोचवतील याचाही अंदाज हवा आणि जाणीव हवी. आपण निसर्गाचं खूप काही देणं लागतो.

पुढच्या पिढीलाही वसुंधरा सुखरूप देणं हे आपलं कर्तव्य आहे. आपण एक सुरेख ब्लु प्लॅनेट Blue Planet नव्या पिढीला देणार की एक Raging (खवळलेला) Planet याचाही निर्णय आपणास घ्यायचा आहे.

अल निनोच्या संकटावर मात करताना आगामी काळात प्रत्येकाने आपली भूमिका समजून आपले कर्तव्य मानून योग्य कृती न केल्यास काळ कठीण आहे. वेळीच सावध व्हा...! अद्याप सुरूवातच झालीय पण उशीर झालेला नाही.

**- प्रशांत दैठणकर,**
**9823199466**

# अनुदानाअभावी शेतकरी रस्त्यावर; शेडनेटधारकांचे आमरण उपोषण सुरू

## 28 लाखांचे कर्ज काढून प्रकल्प उभारला, महाडीबीटीवर पात्र ठरूनही अनुदान रखडले

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासनाच्या कृषी योजनांवर विश्वास ठेवून लाखो रुपयांचे कर्ज काढून शेडनेट गृह उभारणाऱ्या शेतकऱ्यांवर आता उपोषणाची वेळ आली आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत उभारलेल्या शेडनेट प्रकल्पांचे अनुदान तीन महिन्यांपासून रखडल्याच्या निषेधार्थ शेतकऱ्यांनी मंगळवारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. अनुदान तातडीने वितरित करण्याबरोबरच संबंधित अधिकाऱ्यांकडून घातल्या जात असलेल्या जाचक अटी रद्द करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.



शेडनेट प्रकल्पासाठी शासनाची पूर्वसंमती मिळाल्यानंतर कल्याण चव्हाण व भाऊसाहेब काळे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी सुमारे २८ लाख रुपयांचे कर्ज घेऊन प्रकल्प उभारले. काम पूर्ण झाल्यानंतर विभागीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली, आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आली आणि महाडीबीटी पोर्टलवर लाभार्थी पात्र असल्याची नोंदही झाली. मात्र, सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही अनुदानाची रक्कम अद्याप मिळालेली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.

अनुदान रखडल्याने कर्जावरील व्याजाचा बोजा दिवसेंदिवस वाढत असून पुढील हंगामासाठी आवश्यक असलेल्या बियाणे, खते आणि कृषी निविष्ठांच्या खरेदीवरही परिणाम होत आहे. शासनाच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून गुंतवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांना आता आर्थिक व मानसिक तणावाला सामोरे जावे लागत असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

उपोषणस्थळी जनार्दन चव्हाण, अनिल चव्हाण, मारोती चव्हाण, गणेश चव्हाण, विजय काळे, अमोल बुट्टे, ज्ञानेश्वर चव्हाण, योगेश जाधव, अमित गायकवाड, प्रशांत गायकवाड आणि किशोर जाधव यांच्यासह अनेक शेतकरी सहभागी झाले आहेत. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी आणि विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी उपोषणस्थळी भेट देत चर्चा केली. मात्र, कोणताही ठोस निर्णय न झाल्याने शेतकरी आंदोलनावर ठाम राहिले.

### ‘ही दोन नव्हे, शेकडो शेतकऱ्यांची व्यथा’

शेडनेट अनुदानाचा प्रश्न केवळ दोन शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून जिल्ह्यातील शेकडो लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित आहे. शासनाकडून वेळेत अनुदान मिळाले असते तर शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणा आणि आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला नसता. त्यामुळे हे आंदोलन वैयक्तिक नसून शेकडो शेतकऱ्यांच्या हक्काच्या अनुदानासाठी असल्याचा दावा उपोषणकर्त्यांनी केला आहे.

**आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या :**

प्रलंबित शेडनेट अनुदान तातडीने वितरित करावे.

महाडीबीटीवरील पात्र लाभार्थ्यांना विलंब न करता निधी द्यावा.

जाचक अटी त्वरित रद्द कराव्यात.

शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानभरपाई देण्याबाबत निर्णय घ्यावा.

# शासकीय कर्करोग रुग्णालयात 43 दात्यांचे रक्तदान

## महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना व कॅनकीडस किडसस्कॅन फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य कर्करोग संस्था अर्थात शासकीय कर्करोग रुग्णालय येथे दररोज हजारो रुग्ण येतात. दाखल झालेल्या रुग्णांना दररोज रक्ताची गरज पडते. यादरम्यान घाटीतील विभागीय रक्तपेढी कर्करोग रुग्णालयास रक्तपुरवठा करते. हा तुटवडा लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर, शाखा शासकीय कर्करोग रुग्णालय व कॅनकीडस किडसस्कॅन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबीर आयोजित केले असता 43 दात्यांनी सहभाग घेतला.



जागतिक रक्तदान दिनानिमित्त बालकर्करोग रुग्णासाठी शासकीय कर्करोग रुग्णालय येथे रक्तदान शिबीर संपन्न झाले. या रक्तदान शिबीराच्या अध्यक्षस्थानी घाटीचे डॉ. शिवाजी सुक्रे हे होते. संघटना नेहमीच रुग्णहिताचे तसेच राज्यातील परिचारिकांच्या कल्याणार्थ सनदशीर मार्गाने काम करत असते. याचबरोबर विविध मार्गाने सामाजिक हित जोपासण्याचे ही कार्य करत असते. कॅनकीडस किडसस्कॅन फाऊंडेशन ही भारतातील बाल कर्करोगासाठी राष्ट्रीय सोसायटी फॉर चेंज आहे. जी बालपण कर्करोगाच्या काळजीच्या संपूर्ण क्षेत्रात काम करते. मुलांना व त्यांच्या कुटुंबाला समग्र आधार देण्याचे कार्य करते. बालकर्करोग रुग्ण वय वर्ष ० ते १९ वयोगटातील रुग्णासाठी काम करत असते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे व इतर पाहुण्यांचे स्वागत बालरुग्णांनी कागदांपासून तयार केलेले पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

डाखोरे यांनी प्राथमिक उपचार म्हणून औषध गोळ्या दिल्या, त्याने फरक पडत नसल्याने चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी डॉ. विवेकानंद खांडरे, आरोग्य सेवक आणि परिचारिका यांच्याकडून गावातील हनुमान मंदिरासमोर 20/25 महिलांना सलाईन लावून उपचार सुरू करण्यात आले.

मात्र, हे उपचार मंदिरासमोरच खाली अंथरलेल्या चटईवर सुरु होते. याबाबत सोशल माध्यमांवर एक व्हिडीओ व्हायरल झाला. त्यानंतर, रुग्णांना चारठाणा येथील आरोग्य केंद्रात हलवण्यात आले आहे.

मंदिरासमोर चटईवर उपचार करण्याबाबत या पथकाशी विचारणा केली असता रुग्णांच्या म्हणण्यांनुसारच आम्ही गावात हे उपचार केल्याचे त्यांनी सांगितले. गावात मागच्या 4 दिवसात 65 ते 70 रुग्णांना हा त्रास सुरु होता, यातील काही जण उपचारानंतर बरे झाले. दरम्यान गावातील विहिरीचे दूषित पाणी पिल्याने हा त्रास सुरु झाला असल्याचा प्राथमिक अंदाज असून त्या पाण्याचे नमुने तपासणी साठी पाठवण्यात आले आहेत. पिपराळा गावात चटईवर उपचार सुरु असल्याबाबत काही फोटो आमदार रोहित पवार यांनी सोशल माध्यमात टाकले असून परभणीच्या पालकमंत्री तथा राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या मतदार

# गोदावरी पात्रातून अवैध रेतीचा गोरख धंदा पोलिसांच्या आशीर्वादाने चालतो

## आ. डॉ. गुट्टे यांचा स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षकावर गंभीर आरोप

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून वाहणाऱ्या गोदावरी नदीपात्रा शासनाचे नियम धाब्यावर बसून मोठ्या प्रमाणावर अवैद्य रेती उपसा सुरू असल्याचा गंभीर आरोप आ. डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी परभणी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या लेखी तक्रार पत्राद्वारे केली आहे.

लेखी तक्रार तसेच शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमानुसार वाळू उपसा करण्याचे 9 जून 2016 पर्यंत निश्चित करण्यात आले होते तरीही वाळू माफियांनी नदीपात्रे धुमाकूळ घालून अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणात चालू केला आहे या सर्व गोष्टींमध्ये दुर्दैव म्हणजे स्थानिक गुन्हे शाखा परभणी येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या परभणी पोलीस निरीक्षकांच्या आशीर्वादाने हा गौरख धंदा राज रोस पणे सुरू असल्याचा थेट आरोप आ गुट्टे यांनी आपल्या लेखी तक्रारी पोलीस अधीक्षकाकडे केला आहे शासनाने नऊ जून 2026 सर्व. नियमाचे काटेकोरपणे पालन करून ठरवून दिलेल्या घाटातूनच रेती उपसा साठी परवानगी दिली होती त्यानंतरही काही रेती माफिया गोदावरी नदी पात्रातून नियमाची पायमल्ली करत अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणात करत आहेत पर्यावरणाचे फार मोठे नुकसान होत आहे हे गंभीर बाब म्हणजे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र भानुदास सरोदे यांच्या कृपाप्रसादानेच



हा अवैध उपसा सुरू असल्याचे प्रत्येक रेती वाहतूक करणाऱ्या हवामागे त्यांच्याकडून प्रति महिना दीड लाख रुपये महिना घेतला जात असल्याचा खात्रीशीर दावाही आ.डॉ.गुट्टे यांनी केला आहे त्यांची पोलीस अधीक्षक स्तरावरून तातडीने चौकशी करण्यात यावी अशी मागणीही त्यांनी केली गंगाखेड मतदार विधानसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात रीती उपशाबरोबरच पत्त्याचे क्लब पुन्हा सुरू झाले आहेत तसेच अवैध दारू आणि गुटखा विक्रेत्यांना पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी अभय दिल्याचेही आमदार गुट्टे यांनी पत्राद्वारे म्हटले आहे विशेष करून या संदर्भात स्थानिक पोलीस स्टेशनने कोणतीही कार्यवाही करू नये अशा स्पष्ट सूचना पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी दिली असल्याची माहिती त्यांनी पत्रात नमूद केले आहे शिवाय असे अवैध कामे सुरू ठेवण्यासंदर्भात पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना कोणी असा उद्दीन सवाल डॉक्टर कुठे यांनी पत्राद्वारे उपस्थित केला अशाच आशियाचे पत्र विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र नांदेड व जिल्हाधिकारी परभणी यांना दिलेल्या तक्रार पत्रामुळे पोलीस परभणी पोलीस दलात मोठी खळबळ उडाली असून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून यावर काय कारवाई होते याकडे सर्व जनतेचे लक्ष लागले आहे तुम्हाला 24 तासाचा अल्टिमेटम देतोय असेही रत्नाकर गुट्टे म्हणाले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# भुवनेश्वर येथे अभाविपची तीन दिवसीय राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठक संपन्न!

## शैक्षणिक सुधारणा, महिला सुरक्षा, अर्बन माओवाद व जागतिक परिस्थितीवर चार महत्त्वपूर्ण प्रस्ताव पारित!

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठक २९ ते ३१ मे २०२६ या कालावधीत भगवान श्रीजगन्नाथांच्या पावन भूमीवर भुवनेश्वर येथे यशस्वीरित्या संपन्न झाली. देशभरातील ४६ प्रांतांमधून ४०० हून अधिक प्रतिनिधी कार्यकर्त्यांनी या महत्त्वपूर्ण बैठकीत सहभाग नोंदविला.

या बैठकीत विविध शैक्षणिक, राष्ट्रीय व सामाजिक विषयांवर सखोल चर्चा करून चार महत्त्वपूर्ण प्रस्ताव सर्वानुमते पारित करण्यात आले. यामध्ये शैक्षणिक सुधारणा परिणामकारक करण्यासाठी तळागाळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक,सशस्त्र माओवादाच्या समाप्ती काळात अर्बन माओवाद हे गंभीर आव्हान,संघटित गुन्हेगारी व जिहादी मानसिकतेतून महिलांचे शोषण आणि मतांतरण रोखणे आवश्यक व जागतिक अनिश्चिततेच्या काळात संयम आणि सजगतेचा सामूहिक संकल्प ही काळाची गरज अशा चार महत्त्वपूर्ण विषयांवर प्रस्ताव पारित करण्यात आले.

राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठकीपूर्वी २७ मे रोजी झालेल्या केंद्रीय कार्यसमिती बैठकीत "लोकशाही मूल्यांच्या पुनर्स्थापनेसाठी पश्चिम बंगालच्या जनतेचे अभिनंदन" हा अभिनंदन प्रस्तावही संमत करण्यात आला. तसेच केंद्रीय कार्यसमिती बैठकीच्या माध्यमातून विकसित भारताच्या संकल्पनेला गती देण्यासाठी भारतीय उद्योग क्षेत्राने संशोधन व विकास (Research & Development) क्षेत्रातील गुंतवणूक वाढवावी, असे आवाहन अभाविपतर्फे करण्यात आले.

राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठकीदरम्यान राष्ट्रीय परिस्थिती, शिक्षणव्यवस्था, युवकांची भूमिका, राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक-आर्थिक विषय आणि देशासमोरील समकालीन आव्हाने यांवर व्यापक चर्चा-विचारमंथन करण्यात आले. तसेच अखिल भारतीय विचार बैठक व संघटनात्मक विचार बैठकीतील निर्णयांचा आढावा घेण्यात आला. विविध अभियानात्मक, कार्यक्रमात्मक आणि संघटनात्मक उपक्रमांची समीक्षा करून आगामी वर्षासाठी सविस्तर कार्ययोजनाही निश्चित करण्यात आली.

आंतरराज्यीय छात्र जीवन दर्शन (SEIL) या राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी देणाऱ्या उपक्रमाच्या ६० वर्षांच्या गौरवपूर्ण प्रवासानिमित्त देशभर 'SEIL@60' कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय 'स्क्रीन टाइम टू ॲक्टिव्हिटी टाइम', 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्षांचा उत्सव, आणीबाणी विरोधाच्या ५० वर्षांची स्मृती, श्री गुरु तेगबहादूर यांच्या बलिदान दिनाचे ३५० वे वर्ष तसेच संत रविदास महाराजांच्या ६५० व्या प्राकट्योत्सवानिमित्त वर्षभर विविध देशव्यापी अभियानांचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. देवगिरी प्रदेशातून या राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठकीसाठी एकूण ८ कार्यकर्ते उपस्थित राहिले.

अभाविपचे देवगिरी प्रदेश मंत्री डॉ.वरुणराज नन्नवरे म्हणाले की,

"राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठकीत पारित करण्यात आलेले प्रस्ताव हे केवळ वर्तमानातील आव्हानांवरील अभाविपची प्रतिक्रिया नसून विकसित, सुरक्षित आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठीची व्यापक दृष्टी प्रतिबिंबित होणारे आहेत. शिक्षण हे गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित करण्यासाठी, राष्ट्रीय सुरक्षेसमोरील अर्बन माओवादासारख्या आव्हानांना उत्तर देण्यासाठी, महिलांविरोधातील संघटित गुन्हेगारी व मतांतरणाच्या कारवायांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी आणि जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रहित जपण्यासाठी देशातील युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. भारताला मजबूत अर्थव्यवस्था बनवून जागतिक पटलावर विकसित राष्ट्र बनविण्यासाठी युवक, शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्यात समन्वय निर्माण होणे गरजेचे आहे. संशोधन व विकास क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून युवक आणि विद्यापीठांशी दीर्घकालीन भागीदारी निर्माण करण्याचे आवाहन अभाविप भारतीय उद्योग क्षेत्राला करत आहे. ही राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठक अभाविपच्या महाराष्ट्रसह देशभरातील कार्याला गती आणि दिशा देणारी ठरेल."

## उपसभापती अश्विनीताई सोनवणे यांची प्राथमिक आरोग्य केंद्र आळंद येथे पाहणी



**फुलंब्री प्रतिनिधी :** पंचायत समिती फुलंब्रीच्या उपसभापती तथा जनआरोग्य समिती सदस्या सौ. अश्विनीताई अजिनाथ सोनवणे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, आळंद येथे भेट देऊन आरोग्य सेवांची सविस्तर पाहणी केली. यावेळी रुग्णांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधा, स्वच्छता व्यवस्था, औषधांचा साठा तसेच आरोग्य सेवेच्या गुणवत्तेचा आढावा घेण्यात आला.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, तत्पर व प्रभावी आरोग्य सेवा मिळाव्यात, यासाठी सौ. सोनवणे यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. तसेच आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांच्या अडचणी जाणून घेत त्यांच्या निराकरणाबाबत चर्चा केली.

या पाहणी दौऱ्यात सादिक कारी, समीर पठाण, अजम शेख, भरत गौरे, फईम शेख व कृष्णा सोनवणे उपस्थित होते.

यावेळी प्रथम वैद्यकीय अधिकारी डॉ. शर्वरी मगरकर, द्वितीय वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लवी राजपूत, आरोग्य सहाय्यक श्री. रविंद्र पंडित व आरोग्य सहाय्यिका श्रीमती तेजवंती सोनवणे यांनी आरोग्य केंद्रातील विविध सेवांची माहिती दिली.

## बनोटी येथे 35 बालकाची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधी वाटप



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१६ जून :** तालुक्यातील बनोटी येथे प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल आरोग्य सुरक्षा अंतर्गत झालेल्या बाल आरोग्य तपासणी शिबिरात ३५ बालकाची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधी वाटप करण्यात आले.

या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ.खालिद झाकी यांनी सांगितले की जिल्हा शल्य चिकित्सक मुदखेडकर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.चावला व वैद्यकीय अधीक्षक खंदारे यांच्या मार्गदर्शनाने कुपोषण कमी करण्यासाठी सर्वत्र आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. व बालकांना आरोग्य तपासणीनंतर संजय शहापूरकर यांच्या हस्ते मोफत औषधी वाटप करण्यात येणार आहे.

त्या नंतर डॉ.अख्तरी पठाण यांच्या हस्ते बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात आले. या प्रसंगी अंगणवाडी सेविका देवकन्या आसवाल,रत्ना जाधव,लताबाई वाघ,अनिता कुंभार,कविता शिंदे,सविता पाटील,जयश्री वाडेकर,सरिता पाटील,बेबी आधारे व मदतनीस उपस्थित होते.

## आ.महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली विजय भोईर यांची महावितरणकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** उरण तालुक्यात वारंवार वीजपुरवठा खंडित होणे व व्होल्टेजमध्ये सतत चढ-उतार होत असल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय राजाराम भोईर यांनी महावितरण प्रशासनाकडे उपस्थित केला आहे. उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण उरण विभाग यांना निवेदन दिले.

या निवेदनात वारंवार होणाऱ्या वीज खंडिततेमुळे घरगुती विद्युत उपकरणांचे नुकसान होत असल्याने तातडीने दुरुस्ती व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्युत यंत्रणेची तपासणी करून संभाव्य अपघात टाळावेत, तसेच नुकसानग्रस्त ग्राहकांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

दरम्यान, या संदर्भातील निवेदन ऊर्जा विभागाच्या मंत्र्यांनाही ई-मेलद्वारे पाठविण्यात आले असून उरणकरांना सुरक्षित, दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळावा, अशी अपेक्षा विजय भोईर यांनी व्यक्त केली आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२६/२०२७ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : १६-०६-२०२६

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, इश्वर शंकर पगारे यांनी मोहल्ला वार्ड क्र 16 स.नं.----- मधील प्लॉट / घर क्रमांक 1424 त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व : नगर पंचायतची खूली जागा, पश्चिम : गांवठाण अंतर्गत सरकारी वापराचा रस्ता, दक्षिण : नगर पंचायत मिळकत नं. 1425 ची जागा., उत्तर : नगर पंचायत मिळकत नं. 1423 ची जागा.

आकार : पूर्व पश्चिम 20x40 = 800 दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगर पंचायत सोयगाव

## शाही स्वागताने घोड्यावरून विद्यार्थ्यांची दिमाखदार मिरवणूक

हिंदू प्रकाशवार्ता

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी दि.१५ जून महानगरपालिकेच्या प्रियदर्शनी विद्यालयात प्रवेशोत्सव चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी उपमहापौर श्री.राजेंद्र जंजाळ ,महिला व बालकल्याण सभापती श्रीमती .शोभाबुरांडे,नगरसेविका अर्चना निळकंठ व अनिता मानकापे तसेच उपायुक्त लखीचंद चव्हाण, सागर निळकंठ, किशोर मानकापे, डायटच्या वरिष्ठ अधिव्याख्याता मंजुश्री क्षीरसागर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



याप्रसंगी सुरुवातीला नवप्रवेशित विद्यार्थ्यांची घोड्यावर व घोडा गाडीवर बसवून मिरवणूक काढण्यात आली.

शोभा यात्रेमध्ये पालखी सजवण्यात आली होती. पालखीमध्ये सरस्वतीची मूर्ती व बालभारतीचे पुस्तक ठेवण्यात आले होते, मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक शोभायात्रेमध्ये सहभागी झाले होते. लेझीम ढोल ताशे व बँड च्या निनादांमध्ये लहान मुलं नाचत होती त्यांना पाहून पाहुण्यांना सुद्धा राहवले नाही व त्यांनीही मुलांसोबत नृत्यात सहभाग घेतला.

शोभा यात्रेमध्ये कार्टूनचे ड्रेस घातलेले अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रारंभी सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. उपमहापौर राजेंद्र जंजाळ व सर्व प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके व गणवेश चे वाटप करण्यात आले.

अण्णामृत फाउंडेशन तर्फे विद्यार्थ्यांना आज खिचडी सोबत सोनपापडी व चिवडा चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासन अधिकारी तथा मुख्याध्यापक संजीव सोनार व संचलन तेजस्विनी देसले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले

## शिव प्रतिष्ठान करंजाडे यांच्या वतीने अनाथाश्रममध्ये शालेय कीट चे वाटप

दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** शिव प्रतिष्ठान करंजाडे या सामाजिक संस्थेने शिवराज्याभिषेक सोहळ्याचे ओचित्य साधून अनाथ निराधार मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून एक समाजापूढे आदर्श निर्माण केला आहे.ह्या कार्यक्रमाला शिवप्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील, सुनील अंबावडे,प्रशांत श्वट्टी,अमर कुसले, शिव प्रतिष्ठान सचिव राकेश कुसले, योगेश कुलाल, अथर्व आदी मान्यवर उपस्थित होते. ह्या वेळेस गिरीजा फॉउंडेशन च्या संस्थापिका सुनिता मॅडम ने प्रसार माध्यमाशी



बोलताना असे सांगितलं की शिव प्रतिष्ठान गेल्या दोन वर्षापासून सर्व अनाथ निराधार मुलांना शैक्षणिक साहित्य असुद्या किंवा राशन असुद्या नेहमीच ते आमच्या गरजा पूर्ण करत असतात म्हणून शिव प्रतिष्ठान ची समाजाप्रती काम करण्याची जी जिद्द आहे अश्या जिद्दीला आमचा सलाम आहे.येणाऱ्या कालावधील मी महाराष्ट्र शासनाला विनंती करते की शिव प्रतिष्ठान करंजाडे ला एक सामाजिक पुरस्कार देण्यात यावा.त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा. शिवप्रतिष्ठान करंजाडे या सामाजिक संस्थेतर्फे वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. सदर राबविलेल्या उपक्रमामुळे अनाथ निराधार मुलांना अत्यंत गरजेचे असलेले शैक्षणिक साहित्य किट प्राप्त झाल्याने त्यांनी आनंद व समाधान व्यक्त करत शिवप्रतिष्ठान करंजाडेचे आभार मानले आहेत. सदर उपक्रमाचे सर्वच क्षेत्रातून कौतुक होत असून असे उपक्रम सर्वत्र राबविले पाहिजे अशा भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

## मनसे तर्फे विद्यार्थ्यांना छत्री व खाऊ वाटप





हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक तथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्ताने आज बेलपाडा गावातील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गव्हाण विभाग सचिव ( समाजसेवक ) प्रदीप महादेव ठाकुर यांच्या पुढाकाराने बेलपाडा गावातील विद्यार्थ्यांसाठी छत्री व खाऊ वाटत करण्यात आले. त्या वेळी पनवेल तालुका सचिव निर्दोष केशव गोंधळी, उलवे शहर माजी अध्यक्ष राहुल बाबुराव पाटील,उलवे शहर अध्यक्ष आकाश श्रीकांत देशमुख, गव्हाण विभाग उपाध्यक्ष बाळकृष्ण ( बबलु) जगन्नाथ पाटील, संदिप म्हात्रे, अजित ठाकूर, गजानन म्हात्रे आदि विभागातील बरेच पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.छत्री व खाऊ वाटप केल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. सदर उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## एमजीएममध्ये वर्षामंगल दिन उत्साहात साजरा

### कुलपती अंकुशराव कदम यांचा 82 वा वाढदिवस साजरा



**छत्रपती संभाजीनगर, :** महात्मा गांधी मिशनचे सचिव तथा एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांचा ८२ वा वाढदिवस आज 'वर्षामंगल' दिनाच्या निमिताने एमजीएममध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या औचित्याने वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम, उद्घाटन आणि समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात एमजीएम गांधेली परिसरात आज ८३ वृक्षांची लागवड करून करण्यात आली. त्यानंतर सकाळी एमजीएम विद्यापीठ परिसरात नव्याने उभारलेल्या इलेक्ट्रिकल सब स्टेशन'चे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी प्रातिनिधिक स्वरूपात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच रुक्मिणी सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात सर्वांना वृक्ष वाटप करण्यात आली. त्याचप्रमाणे एमजीएम युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल इंजिनिअरिंगच्या शैक्षणिक सुविधांच्या नामफलकांचे अनावरण यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, शिक्षणतज्ज्ञ श्री.भाऊसाहेब राजळे, डॉ.पी.वाय.कुलकर्णी, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, श्रीमती अनुराधाताई कदम तसेच एमजीएम परिवारातील सर्व सदस्य, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कुलपती अंकुशराव कदम यांना शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आज प्रत्यक्षपणे भेट घेऊन वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## गुणात्मक, संख्यात्मक वाढीसाठी प्रयत्न करा; प्राचार्य, विभागप्रमुखांच्या बैठकीत कुलगुरुंचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर, :** येत्या शैक्षणिक वर्षात सर्व विभागांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या वाढली पाहिजे. तसेच सर्व प्राध्यापकांनी शोधनिबंध व संशोधन प्रकल्पांचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सर्व पदव्यूत्तर विभागप्रमुखांची बैठक मंगळवारी महात्मा फुले सभागृहात घेण्यात आली. यावेळी प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर सर्व अधिष्ठाता, संवैधानिक अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठातील पदव्यूत्तर विभाग उन्हाळी सुट्टीनंतर १५ जूनपासून सुरु झाले. सर्व विभागात२ ते २८ जून या काळात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या संदर्भात विभागप्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी कुलसचिव डॉ. अमृतकर यांनी 'एज्युकेशन एक्सपो'च्या यशस्वीतेसाठी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व कर्मचा-यांनी उत्कृष्ट प्रयत्न केल्याचबद्दल अभिनंदन केले. तर प्रकुलगुरु डॉ. वक्ते म्हणाले, सन २०२६-२७ या वर्षात शैक्षणिक वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करण्यात येणार आहे. कुलगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रमांची रचना, परीक्षा व सर्व प्रकारचे नियोजन करण्यात येणार आहे. यावेळी डॉ. फुलारी यांनी विद्यापीठ मुख्य परिसरातील ४५ विभाग व धाराशिव उपपरिसरातील ० विभाग अशा सर्वच ठिकाणी पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रत्येक अभ्यासक्रमांस किमान २० प्रवेश होणे गरजेचे आहे. 'एईडीपी'चे ९ अभ्यासक्रम सुरु करण्यात आले असून प्रत्येक ठिकाणी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस' घेण्यात येईल. तसेच अ‍ॅडजंक्ट प्रोफेसर, व्हिजीटींग प्रोफेसरची पदे भरण्यात येतील. सर्व प्राध्यापक, विभागप्रमुखांनी व कर्मचा-यांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश वसतीगृह प्रवेश यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. बैठकीस उपकुलसचिव माधव वागतकर, अभिषेक कदम हेही उपस्थित होते.

# राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवस 51 हजार वह्या व पुस्तके वाटप करुन राज्य भर साजरा

## दिपक आगळे पाटील यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य एन जी ओ फेडरेशन चा अभिनव उपक्रम

**छत्रपती संभाजी नगर प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदामंत्री व अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शाळेत साहित्य वाटप प्रेरणादायी उपक्रम राबवून एक नविन उपक्रम राबवून वाढदिवस साजरा केला. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य एन जी ओ फेडरेशन च्या व फेडरेशन चे संस्थापक अध्यक्ष दीपक आगळे पाटील यांच्या माध्यमातून राज्याभरातील जवळपास 651 सामाजिक संस्था व सार्वजनिक वाचनालय यांनी 51 हजार वह्या पुस्तके शालेय साहित्य



जिल्हा परिषद शाळा मध्ये वाटप करुन राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा केला. राधाकृष्ण विखे पाटील यांनी माझ्या वाढदिवसाकरीता सर्व अनावश्यक खर्च टाळून तो निधी राज्यातील सर्व गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय साहित्य देण्यासाठी किंवा त्यांच्या शिक्षणासाठी वापरावा हिच माझ्यासाठी खरी शुभेच्छा ठरेल या अभिनव उज्वल उपक्रमासाठी राज्यातील सामाजिक संस्थांनी भरभरून प्रतिसाद दिऊन राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसा साजरा केला. यासाठी शालिनीताई विखे पाटील व युवकाचे आधारस्तंभ खा.सुजयदादा विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य एन जी ओ फेडरेशन चे संस्थापक अध्यक्ष दिपक आगळे पाटील यांनी स्व सखाराम बाळा पाटील आगळे सेवा भावी संस्थेच्या माध्यमातून शिरसगाव,गोपाळपुर, धनगरवाडी, धामोरी, वरखेड , सुरेगांव, खडका, रामढोह, खाटकवाडी, भानसहिवरे गिडेगाव, शालेय साहित्य वाटप करुन साजरा केला यावेळी सुनिलराव लंघे पाटील अशोकराव लंघे पाटील शिक्षक व अनंत सामाजिक प्रतिष्ठान वरखेड देवी चे अध्यक्ष अनंत रासणे, अभिषेक पटारे पाटील, पाथरवाला येथे अमोल खाटीक, नगर येथे प्रियंका ताई बेरड , आश्विनीताई झरेकर, राजकुमार मुंढे साहेब अकबर भाई शेख, प्रसाद निकम पाटील, ताई बागडे, विद्याताई अग्निहोत्री, संतोष शिंदे, अनिल देशमुख सर आदिनाथ पटारे पाटील, आण्णासाहेब बनसोडे, गणेश वाळुंजकर , भास्कर उघडे, संजय गायकवाड,. स्मिता ताई पाटील. शेख शब्बीर मन्सुरी आधिकराव जगताप, सुनिल मतकर, चंद्रकांत मुरकुटे, बाबासाहेब दहिफळे, शामभाऊ पाठक, विद्या ताई सोनवणे, अतुल कदम, आदी महाराष्ट्र राज्य एन जी ओ फेडरेशन च्या पदाधिकारी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चे मुख्यध्यापक व शिक्षण यांनी परिश्रम घेतले.

**राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य एन जी ओ फेडरेशन च्या 651 संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचे मी मनापासुन आभार की माझ्या आव्हानाला प्रतिसाद देऊन आदरणीय ना राधाकृष्णजी विखे पाटील साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप करुन वाढदिवस साजरा केला त्याबद्दल मनापासून सर्व संस्था प्रमुख यांचे आभार**

**- दीपक आगळे पाटील**
**संस्थापक अध्यक्ष . महाराष्ट्र राज्य एन जी ओ फेडरेशन**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# बिडकीनच्या औद्योगिक प्रगतीचा केंद्रीय राज्यमंत्र्यांकडून आढावा

## JSW, Toyota, Ather आणि Endurance प्रकल्पांना भेट



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या विकास व विश्वास पर्वानिमित्त केंद्रीय राज्यमंत्री सौ. निमुबेन बांभाणिया यांनी मंगळवारी बिडकीन येथील वेगाने विकसित होत असलेल्या औद्योगिक क्षेत्राला भेट देत JSW, Toyota, Ather आणि Endurance या प्रमुख प्रकल्पांच्या कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष किशोर शितोळे, नगरसेवक रामेश्वर भादवे, सौ. छाया खाजेकर, माजी नगरसेवक दिलीप थोरात तसेच मंडळ अध्यक्ष निखिल महाले उपस्थित होते. संबंधित प्रकल्पांच्या अधिकाऱ्यांनी उद्योगांच्या उभारणीची सद्यस्थिती, उत्पादन क्षमता, भविष्यातील विस्तार आणि स्थानिक युवकांसाठी उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधींची माहिती दिली. बिडकीन परिसर मराठवाड्याच्या औद्योगिक नकाशावर वेगाने उदयास येत असून केंद्र सरकारच्या उद्योगपूरक धोरणांमुळे मोठ्या गुंतवणुकीला चालना मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या भेटीद्वारे औद्योगिक विकासाला गती देतानाच स्थानिक रोजगारनिर्मिती आणि आर्थिक प्रगतीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला.

# एमजीएमच्या 'लोकरंग'मधून विदेशी अभ्यासकांना भारतीय संस्कृतीची ओळख



**छत्रपती संभाजीनगर दि.१५ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठात आयोजित १७ व्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय शैक्षणिक विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने विद्यापीठाच्या संगीत व नाट्य विभागाच्या चमुने महाराष्ट्रीयन लोककलांचा बहारदार कार्यक्रम सादर करून विदेशी अभ्यासकांचे मने जिंकून घेतली. रुक्मिणी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या 'लोकरंग मराठी मातीचा...' या लोककलेवर आधारित कार्यक्रमास अमेरिका, जॉर्डन, मोरोक्को व इतर देशांतील विदेशी पाहुण्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. डॉ.राजू सोनवणे दिग्दर्शित "लोकरंग..." मध्ये नमन नृत्य, गोंधळ, कोळी नृत्य, भारुड, लावणी, अभंग इत्यादी कलाप्रकारांचे सादरीकरण संपन्न झाले. यामध्ये दिलीप खंडेराय, श्रद्धा कांबळे, राहुल खरे, प्रभाकर रेणुके, विक्रम रेणुके, राजू सोनवणे आणि इतर कलावंतांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास नॉर्थ बेंगळुरू विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.बी.के.रवी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

# झाल्टा फाट्यावर एमडी ड्रग्जचा साठा जप्त; दोन तस्कर जेरबंद

## ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई; 7.39 लाखांचा मुद्देमाल हस्तगत

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : अमली पदार्थांच्या वाढत्या तस्करीविरोधात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत झाल्टा फाटा परिसरातून मेफेड्रोन (एमडी) या घातक अमली पदार्थासह दोन आरोपींना अटक केली. या कारवाईत ६२.२७ ग्रॅम एमडी पावडरसह कार, मोबाईल फोन, डिजिटल वजनकाटा व रोख रक्कम असा एकूण ७ लाख ३९ हजार ५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक प्रकाश भाऊसाहेब जाधव व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने झाल्टा फाटा येथे सापळा रचला.

सायंकाळी सहाच्या सुमारास



संशयित कार (एमएच १४ एचयू ०६३९) अडवून झडती घेतली असता अर्जुन मिट्ठी साबळकर (वय २८, रा. पाचोड, ता. पैठण) आणि नरेश मांगीलाल बिश्नोई (वय २९, मूळ रा. जालोर, राजस्थान, सध्या पाचोड) यांच्या ताब्यातून २ लाख ४९ हजार ८० रुपयांची एमडी पावडर आढळून आली. आरोपींकडून ड्रग्ज विक्रीसाठी वापरण्यात येणारा डिजिटल वजनकाटा, मोबाईल फोन आणि रोख रक्कमही जप्त करण्यात आली. या प्रकरणी चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६१/२०२६ अन्वये एनडीपीएस कायद्याच्या कलम 8(c), 22(c) व 29 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, पोलीस हवालदार कासीम शेख, सचिन राठोड, सुनील गोरे, अंगद तिडके, रवि लोखंडे, पोलीस अंमलदार बलबिरसिंग बहुरे, शिवाजी मगर, योगेश तरमळे तसेच चिकलठाणा पोलीस ठाण्याचे सचिन ढवळे, दीपक देशमुख, एफएसएलचे प्रतिक जाधव, साक्षी राठोड आणि अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहभागातून पार पडली.

# गुलमंडी चौकातील डीपी स्थलांतरासाठी हालचाली

## स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांची प्रत्यक्ष पाहणी

हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी:** शहरातील गजबजलेल्या गुलमंडी चौकात वाहतुकीस अडथळा ठरत असलेल्या विद्युत पुरवठा केंद्र (डीपी) संदर्भात आज स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.



गेल्या अनेक वर्षांपासून चौकाच्या मध्यभागी असलेली ही डीपी वाहतूक कोंडी तसेच नागरिकांच्या दैनंदिन हालचालींसाठी अडचणीची ठरत आहे. विशेषतः पादचारी आणि वाहनचालकांना यामुळे मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या.

पाहणीदरम्यान रस्त्यात अडथळा निर्माण करणारे विद्युत खांब तातडीने हटविण्यासह परिसरातील सर्व विद्युत केबल भूमिगत करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. यामुळे वाहतुकीचा मार्ग अधिक मोकळा होण्यासोबतच परिसराचे सौंदर्यीकरण आणि सुरक्षितता वाढण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर मकरिये यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून डीपीचे तातडीने स्थलांतर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करण्याच्या सूचनाही दिल्या. डीपी स्थलांतरित झाल्यानंतर वाहतुकीचा प्रवाह सुरळीत होण्यास, कोंडी कमी होण्यास आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेत वाढ होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासह मूलभूत सुविधा अधिक सक्षम आणि सुकर करण्यासाठी महापालिका प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# शिवाजीनगर भुयारी मार्गात जड वाहनांना प्रतिबंध; नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**छत्रपती संभाजीनगर** : शिवाजीनगर भुयारी मार्ग येथे जड वाहनांना प्रवेशबंदी असतानाही अनेकदा जड वाहने या मार्गातून नेली जात होती. त्यामुळे भुयारी मार्गात वाहतूक कोंडी निर्माण होऊन नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

या बाबीची गांभीर्याने दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे शिवाजीनगर भुयारी मार्गाच्या दोन्ही बाजूंना गार्डर बसविण्यात आले आहेत. त्यामुळे जड वाहनांना भुयारी मार्गातून प्रवेश करणे शक्य होणार नाही.

तथापि, यानंतरही कोणी जड वाहन भुयारी मार्गातून नेण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित वाहनचालकाविरुद्ध वाहतूक विभागामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा शहर अभियंता संजय कोंबडे यांनी दिला आहे.

नागरिकांनी व वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# ट्रिपल सीट आणि मोबाईलवर बोलणाऱ्या 1,194 वाहनचालकांवर कारवाई; 13.35 लाखांचा दंड वसूल

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी** : शहरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात वाहतूक विभागाने विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे. ट्रिपल सीट दुचाकी चालविणारे तसेच वाहन चालविताना मोबाईलवर बोलणाऱ्या एकूण १,१९४ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून १३ लाख ३५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

वाहनांची वाढती संख्या आणि बेशिस्त वाहनचालकांमुळे शहरात अपघातांचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने रविवारी (१५ जून) सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान शहरातील विविध भागांत विशेष मोहीम राबवली. शहर वाहतूक शाखा-१, शाखा-२, सिडको, छावणी आणि वाळूज या पाचही वाहतूक शाखांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.

या मोहिमेत ट्रिपल सीट




वाहन चालविणाऱ्या ९०८ वाहनचालकांवर कारवाई करून ९ लाख ८ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. तर वाहन चालविताना मोबाईलवर बोलणाऱ्या २८६ वाहनचालकांवर कारवाई करून ४ लाख २७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

वाहतूक विभागाने स्पष्ट केले आहे की, ट्रिपल सीट, वाहन चालविताना मोबाईलचा वापर, रॉंग साईड वाहन चालविणे आणि इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात यापुढेही मोटार वाहन कायद्यान्वये कठोर कारवाई सुरू राहणार आहे.

ही मोहीम पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपआयुक्त शर्मिष्ठा घारगे-वालावलकर आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) सुभाष भुजंग यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

विविध वाहतूक शाखांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला. वाहतूक विभागाने नागरिकांना वाहन चालविताना सर्व नियमांचे पालन करण्याचे, वाहन परवाना व आवश्यक कागदपत्रे सोबत बाळगण्याचे तसेच बेशिस्त वाहनचालन टाळण्याचे आवाहन केले आहे.







मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911